योग व निसर्गोपचार पदवी अभ्यासक्रम (BNYS) महाविद्यालयास मान्यता देण्याबाबत.

सौ.देविबाई नारायणदास छाबडा ग्रामीण शिक्षण संस्था, सातारा संचलित महालक्ष्मी कॉलेज ऑफ नॅचरोपॅथी ॲन्ड योगिक सायन्सेस, हॉस्पीटल ॲन्ड रिसर्च सेंटर, सर्व्हे नं.२५९, मु.पो.रायगांव, ता. जावळी, जि.सातारा

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
शासन निर्णय, क्रमांक: नॅचरो-२०२३/प्र.क्र.४२६/२३/शिक्षण-१
९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक: २१. ११.२०२३.

वाचा :
१) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र.मआविवि/पीबी/युजी/पी-७/१००२/२०२२, दि.२१.०६.२०२२
२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय, क्र.एनयुआर-२०१७/प्र.क्र.२१२/१७/शिक्षण-१, दि. २८.०२. २०१८.
३) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र.जा.क्र.आसंगु/महालक्ष्मी योगा व नॅच. महा /स.त. /सातारा / २०२३ /आयु-२(३)/९१०७, दि.०७.०८.२०२३.

प्रस्तावना:

सौ.देविबाई नारायणदास छाबडा ग्रामीण शिक्षण संस्था, ३० गुलमोहर कॉलनी, गेंडामाळ, आय.टी.आय.च्या बाजुला, सातारा संचलित महालक्ष्मी कॉलेज ऑफ नॅचरोपॅथी ॲन्ड योगिक सायन्सेस, हॉस्पीटल ॲन्ड रिसर्च सेंटर, सर्व्हे नं.२५९, मु.पो.रायगांव, ता. जावळी, जि.सातारा या महाविद्यालयाचा योग व निसर्गोपचार पदवी अभ्यासक्रम (BNYS) सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र. (१) येथील पत्रान्वये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडून शासनास प्राप्त झाला होता. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी बृहत आराखड्यानुसार सदर प्रस्तावाची शिफारस केली होती.

२. उपरोक्त संदर्भ क्र. (२) येथील शासन निर्णयातील तरतूदीनुसार, सदर संस्थेची वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांचेमार्फत सक्षमता तपासणी करण्यात आली. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई यांनी सक्षमता तपासणीचा अहवाल संदर्भ क्र. (३) येथील पत्रान्वये शासनास सादर केला आहे. सक्षमता तपासणी समिती व आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई यांनी उक्त संस्था योग व निसर्गोपचार पदवी अभ्यासक्रम (BNYS) सुरु करण्यास सक्षम असल्याची शिफारस केली आहे. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष, मुंबई यांचेकडून प्राप्त शिफारस विचारात घेऊन, उक्त

संस्थेस शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी ६० (साठ) विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह योग व निसर्गोपचार पदवी अभ्यासक्रम (BNYS) महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष, मुंबई यांनी संदर्भ क्र. (३) अन्वये सक्षमता तपासणी समितीच्या अहवालाच्या आधारावर केलेली शिफारस विचारात घेऊन सौ.देविबाई नारायणदास छाबडा ग्रामीण शिक्षण संस्था, ३० गुलमोहर कॉलनी, गेंडामाळ, आय.टी.आय.च्या बाजुला, सातारा संचलित महालक्ष्मी कॉलेज ऑफ नॅचरोपॅथी ॲन्ड योगिक सायन्सेस, हॉस्पीटल ॲन्ड रिसर्च सेंटर, सर्व्हे नं.२५९, मु.पो.रायगांव, ता. जावळी, जि.सातारा या महाविद्यालयास सन २०२३-२४ साठी ६० (साठ) विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह योग व निसर्गोपचार पदवी अभ्यासक्रम (BNYS) सुरू करण्यास पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून याद्वारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :**

१) सदर अभ्यासक्रमाचे प्रवेशाकरिता राज्य शासन/ केंद्रशासन/ मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कार्यपद्धती अवलंबण्यात यावी.

२) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, राज्य शासन व संबंधित केंद्रिय परिषद/ आयुष मंत्रालय यांनी योग व निसर्गोपचार पदवी अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

३) महाराष्ट्र एज्युकेशन इन्स्टिट्युशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९८८ चा VI) मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

४) शासकीय नियम / अधिनियमाच्या आधारे तसेच मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून त्यानुसार शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

५) संस्था, त्यांच्या महाविद्यालयात शासकीय वैद्यकीय/दंत/ परिचर्या / आयुर्वेद वा तत्सम महाविद्यालयांतील शिक्षकांना ते नियतवयोमानुसार सेवानिवृत्त अथवा स्वेच्छा सेवानिवृत्त असल्याखेरीज कोणत्याही परिस्थितीत नोकरीत ठेवणार नाही.

६) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी योग व निसर्गोपचार पदवी अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या प्रमाणकांची योग्यरित्या पूर्तता करून संस्थेने प्रथम तुकडी बाहेर पडेपर्यंत दरवर्षी शासनाची मान्यता मिळविणे आवश्यक आहे.

७) संस्थेस विना- अनुदानित तत्वावर मान्यता देण्यात आली असल्याने संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरूपाच्या खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही.

८) सदर मान्यता महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष, मुंबई यांच्या शिफारशीस अनुसरून देण्यात येत आहे.

९) संस्थेने योग व निसर्गोपचार पदवी महाविद्यालयास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची संलग्नता मिळाल्यानंतरच विद्यार्थी प्रवेशित करावेत. सदर संस्थेस संलग्निकरण देण्यापूर्वी संस्था सर्व संबंधित निकष/ मानके पूर्ण करत असल्याची खात्री विद्यापीठाने करावी.

१०) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करु नयेत.

११) योग व निसर्गोपचार हा अभ्यासक्रम प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या अखत्यारित नसल्याने सदर अभ्यासक्रमासाठीचे प्रवेश हे इयत्ता बारावीच्या (विज्ञान शाखा) परीक्षेतील गुणवत्तेनुसार करण्यात येतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ च्या कलम ६४ नुसार शासनास प्रदत्त अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अजित सासुलकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. सचिव, आयुष मंत्रालय, आयुष भवन, बी ब्लॉक, नवी दिल्ली-११० ०२३.
५. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष, मुंबई.
६. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.
७. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
८. अध्यक्ष/सचिव, सौ.देविबाई नारायणदास छाबडा ग्रामीण शिक्षण संस्था, सातारा
९. कार्यासन अधिकारी (शिक्षण-२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, ९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
१०. निवडनस्ती (शिक्षण-१)